Exh-B

18

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे यांचे समोर

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५४ अन्वये पुनरिक्षण अर्ज)

पुनरिक्षण अर्ज क्र ३३२ / २०२६

१. श्री दत्तात्रय म्हस्के, अध्यक्ष,
२. श्री नंदकिशोर नरखेडे, सचिव,
दोघे रा मॅजेस्टीक अॅक्वा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्या,
फुरसुंगी, ता हवेली, जि पुणे ४१२ ३०८ अर्जदार

विरुध्द

१. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे
ऑ सहकार वैभव, प्लॉट नं ई / ३, मार्केटिंग फेडरेशन इमारत,
पहिला मजला, हमाल भवनजवळ, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ३७
२. श्री लिंगेश्वर राम लोणारे,
सर्व रा मॅजेस्टीक अॅक्वा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्या,
फुरसुंगी, ता हवेली, जि पुणे ४१२ ३०८
३. मॅजेस्टीक अॅक्वा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्या,
फुरसुंगी, ता हवेली, जि पुणे ४१२ ३०८ प्रतिवादी

अर्जदार यांनी प्रतिवादी क्र १, उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे यांनी दि १८.०८.२०२६ रोजी दिलेल्या कलम ७५ (५) अन्वयेच्या आदेशा विरुध्द सदरचा पुनरिक्षण अर्ज दाखल केलेला आहे. सदर पुनरिक्षण अर्जाची वेळोवेळी सुनावणी होवून अंतिम सुनावणी दि २४.०९.२०२६ रोजी घेण्यात आली. अर्जदार यांचे वतीने अॅड हिंगे व प्रतिवादी क्र २ यांचेवतीने श्री लोणारे, श्रीमती सलमा शेख, श्री अमेय निरगुडकर व इतर यांनी उपस्थित राहून तोंडी म्हणणे मांडले.

अर्जदार यांचेवतीने खालीलप्रमाणे म्हणणे मांडण्यात आले.

१. अर्जदार हे प्रतिवादी क्र ३, मॅजेस्टीक अॅक्वा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्या, फुरसुंगी, पुणे या संस्थेचे अनुक्रमे अध्यक्ष व सचिव आहे. प्रतिवादी क्र २ व इतर हे मूळ तक्रारदार असून प्रतिवादी क्र १ यांनी त्या नुसार दि १८.०८.२०२६ रोजीच्या आदेशाव्दारे अर्जदार यांना अपात्र केले आहे. सदर आदेश मान्य नसल्याने अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज वैयक्तिकरित्या दाखल केलेला आहे.
२. प्रतिवादी क्र २ व इतर सभासदांनी दि १८.०८.२०२५ रोजी प्रतिवादी क्र १ यांचेकडे केलेल्या अर्जामध्ये सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षांचे वैधानिक लेखापरीक्षण झाले नसल्याचे, लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवाल सादर केला नसल्याचे व संबंधित वार्षिक सर्वसाधारण सभा चिहित

मुदतीत घेतल्या नसल्याचे मुद्दे उपस्थित केले होते. त्यानुसार प्रतिवादी क्र १ यांनी दि ०९.०९.२०२५ रोजी कारणे दाखवा नोटीस पारीत केली होती.

३. अर्जदार यांनी त्या अनुषंगाने प्रतिवादी क्र १ यांचेकडे सविस्तर म्हणणे व कागदपत्रे सादर केली होती. तसेच त्यांनी संस्थेची सन २०२१-२२ ची वा.स.सभा दि २५.०९.२०२२ रोजी, सन २०२२-२३ ची वा.स.सभा दि १७.०९.२०२३ रोजी व सन २०२३-२४ ची वा.स.सभा दि २९.०९.२०२४ रोजी घेण्यात आली असल्याचे, संस्थेचे लेखापरिक्षण पूर्ण झाले असल्याचे व दोष दुरुस्ती अहवाल निबंधक कार्यालयास सादर केले असल्याची बाब निदर्शनास आणून दिलेले होते. तथापि ती विचारात न घेताच प्रतिवादी क्र १ यांनी बेकायदेशीरपणे आव्हानित आदेश पारीत केलेला आहे.

४. प्रतिवादी क्र २ यांनी तक्रारी अर्जांवर काही सभासदांच्या सह्या या पार्किंग, स्वच्छता व सुरक्षा इ कारणांबाबत गैरसमज निर्माण करून घेण्यात आल्या होत्या. सदर बाब लक्षात आल्यानंतर संबंधित सभासदांनी त्या मागे देखील घेतलेल्या आहेत. तक्रारदार सभासद हे संस्थेचे थकबाकीदार असल्याची बाब देखील निबंधकांनी विचारात घेतलेली नाही. कारणे दाखवा नोटीसमध्ये नमूद केलेले मुद्दे विचारात न घेताच प्रतिवादी क्र १ यांनी दोष दुरुस्ती अहवाल सभेमध्ये न ठेवणे व कलम ७५ (२)(iii) नुसार शिल्लक निधीच्या विनियोगाची योजनेचा विषय विषयपत्रिकेमध्ये न घेणे या इतर मुद्दयांच्या आधारे अर्जदार यांना अपात्र केलेले आहे. त्यामुळे ज्या मुद्यांच्या आधारे कारणे दाखवा नोटीस देण्यात आली नाही, त्या नवीन मुद्यांच्या आधारे अंतिम आदेश पारीत करणे हे नैसर्गिक न्यायतत्त्वांच्या विरोधात आहे.

५. अर्जदार यांनी सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षांच्या सर्वसाधारण सभा नियमितपणे घेतल्या आहेत, लेखापरिक्षण करुन घेतले असून, दोष दुरुस्ती अहवाल देखील निबंधक कार्यालयास सादर केलेला आहे. त्यामूळे थकबाकीदार सभासदांच्या अर्जाच्या आधारे, प्रतिवादी क्र १ यांनी कारणे दाखवा नोटीसीत नमूद नसलेल्या मुद्यांच्या आधारे इतर संचालकांना जबाबदार न धरता कोणत्याही कारणमीमांसे शिवाय केवळ अर्जदार यांनाच अपात्र करणेबाबत पारीत केलेला आदेश रद्द करणेत यावा.

<u>प्रतिवादी क्र २ यांचेवतीने खालीलप्रमाणे म्हणणे मांडण्यात आले.</u>

१. प्रतिवादी क्र २ व इतर हे मूळ तक्रारदारदार असून त्यांनी प्रतिवादी क्र १ यांचेकडे तक्रार दाखल केली होती. त्यानुसार प्रतिवादी क्र १ यांनी दि १८.०८.२०२६ रोजीच्या आदेशाव्दारे अर्जदार या संस्थेच्या बेकायदेशीर काम करणाऱ्या पदाधिकारी यांना अपात्र केले आहे.

२. आव्हानित आदेशामध्ये दि ०९.०९.२०२५ रोजीच्या कारणे दाखवा नोटीसीमध्ये नमूद नसलेल्या कारणांवर कार्यवाही करण्यात आली असल्याचे अर्जदार यांचे म्हणणे आहे तथापि त्यांनी दाखल केलेल्या अर्जामध्ये दि ०९.०९.२०२५ रोजीची कारणे दाखवा नोटीसच जोडलेली नाही, त्यामूळे प्रत्यक्षात नोटीसीमध्ये कोणते मुद्दे नमूद होते व अंतिम आदेशातील निष्कर्ष नोटीसीच्या कक्षेबाहेर आहेत की नाही हे केवळ अर्जदार यांचे म्हणण्यावरुन ठरविता येणार नाही.

३. प्रतिवादी क्र १ यांनी अर्जदार यांना कलम ७५(५) तसेच कलम ८२(४) या दोन्ही तरतुदी विचारात घेवून अपात्र केले आहे. परंतु अर्जदार यांनी ज्या कारणांसाठी त्यांना अपात्र करण्यात आले आहे ती कारणे पूर्ण केली असल्याबाबतचा पुरावा व त्यामधील तरतूदींचे पालन झाले असल्याची बाब अर्जदार यांनी निदर्शनास आणून दिलेली नाही. याउलट तक्रारदार यांनी माहिती अधिकार अर्जामध्ये मागणी केलेल्या

माहिती बाबत प्रतिवादी क्र १ कार्यालयाने दि २४.०६.२०२५ रोजी दिलेल्या पत्रामध्ये संस्थेचे लेखापरिक्षण अहवाल, दोष दुरुस्ती अहवाल कार्यालयास सादर नसल्याचे कळविले आहे. तसेच तक्रारदार यांचेतील केवळ एकच व्यक्ती थकबाकीदार असली तरी इतर व्यक्तींची तक्रार विचारात घेणे आवश्यक आहे त्यामूळे प्रतिवादी क्र १ यांचा आदेश कायम ठेवणे आवश्यक आहे.

निरिक्षण

१. प्रतिवादी क्र ३, मॅजेस्टीक अॅक्वा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्या. फुरसुंगी, पुणे ही महराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीनुसार नोंदणीकृत सहकारी गृहरचना संस्था आहे. अर्जदार हे संस्थेचे अनुक्रमे अध्यक्ष व सचिव आहेत. प्रतिवादी क्र २ व इतर यांचे तक्रारीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र १ यांनी अर्जदार वा संस्थेच्या पदाधिकारी यांना दि १८.०८.२०२६ रोजीच्या आदेशाव्दारे ६ महिन्यांच्या कालावधीकरीता अनर्ह घोषित केल्याने, अर्जदार यांनी वैयक्तिकरित्या प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. तक्रारदार हे थकबाकीदार असणे, तक्रार अर्जावर सभासदांच्या फसवणूकीने सह्या घेणे, त्यांनी तदनंतर तक्रारी मागे घेतल्या असणे, ज्या कारणासाठी कारणे दाखवा नोटीस पारीत केली आहे त्यातील कारणे विचारात न घेता, इतर कारणांच्या आधारे, कोणतीही कारणमीमांसा नमूद न करता केवळ अर्जदार यांनाच अपात्र केलेले असणे हे मुद्दे अर्जदार यांनी उपस्थित केले आहेत. तर तक्रारदार यांचेपैकी केवळ एकच व्यक्ती थकबाकीदार असून, इतर सभासदांची तक्रार विचारात घेणे आवश्यक आहे, अर्जदार यांनी त्यांच्या म्हणण्याच्या अनुषंगाने दि ०९.०९.२०२५ रोजीची कारणे दाखवा नोटीस सादर केली नाही, केवळ अर्जदार यांचे म्हणणे विचारात घेवून संबंधित बाब खरी मानता येणार नसल्याचे प्रतिवादी क्र २ यांनी नमूद केले आहे. आव्हानित आदेशातील संदर्भावरुन प्रतिवादी क्र १ यांनी कलम ७५ (५) मधील तरतूदी विचारात घेवूनच दि ०९.०९.२०२५ रोजी नोटीस दिल्याचे दिसून येत आहे.

३. अर्जदार यांनी सन २०२१-२२, २०२२-२३ व २०२३-२४ या वर्षांच्या सर्वसाधारण सभा नियमितपणे घेतल्या आहेत, संबंधित कालावधीचे वेळोवेळी लेखापरिक्षण करुन घेतले असून, दोष दुरुस्ती अहवाल देखील निबंधक कार्यालयास सादर केला असल्याचे नमूद केले आहे. तर अर्जदार यांनी विहीत मुदतीत सदर कार्यवाही न केल्याची बाब प्रतिवादी क्र १ यांनी विचारात घेवून योग्यरित्या आदेश पारीत केला असल्याचे प्रतिवादी क्र २ यांनी नमूद केले आहे.

४. प्रतिवादी क्र २ या संस्थेच्या सभासदांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र १ यांनी संबंधितांना कलम ७५ (५) अन्वये नोटीस देवून नैसर्गिक न्यायतत्वानुसार सुनावणीची संधी दिलेली आहे. अर्जदार यांनी कलम ७५ (५) नुसार विहीत मुदतीत सर्वसाधारण सभा घेतल्या असल्या तरी त्यांनी कलम ७५ (२)(iii) मध्ये नमूद विनियोगाच्या योजनेचा विषय संबंधित सभांच्या विषयपत्रिकेवर घेतला असल्याबाबत व कलम ८२ (४) नुसार मागील वर्षांचा दोष दुरुस्ती अहवाल वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर ठेवल्याचे व तो विहीत मुदतीत प्रतिवादी क्र १ यांचे कार्यालयास सादर केल्याबाबत कोणतेही म्हणणे सादर केल्याचे दिसून येत नाही. तक्रार अर्जातील एक सभासद थकबाकी असला तरी इतर सभासदांच्या तक्रारीनुसार प्रतिवादी क्र १ यांना कार्यवाही करणेचा अधिकार आहे. प्रतिवादी क्र १ यांनी

22

प्रति,

१. श्री दत्तात्रय म्हस्के
२. श्री नंदकिशोर नरखेडे
३. उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे
४. श्री लिंगेश्वर राम लोणारे
५. मॅजेस्टीक अॅक्वा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्या, फुरसुंगी, ता हवेली, जि पुणे ०८



(दिग्विजय आहेर)
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे

T-C
&
Adv

आदेश पारीत करताना योग्य कारणमीमांसा नमूद करुन संस्थेच्या अर्जदार या पदाधिकारी यांना ६ महिने कालावधीकरीता अपात्र केल्याचे दिसून येत आहे.

अनुमान

उक्त निरिक्षणे विचारात घेता, प्रतिवादी क्र २ या संस्थेच्या सभासदांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र १ यांनी संबंधितांना कलम ७५ (५) अन्वये नोटीस देवून नैसर्गिक न्यायतत्वानुसार सुनावणीची संधी दिलेली आहे. अर्जदार यांनी कलम ७५ (५) नुसार विहीत मुदतीत सर्वसाधारण सभा घेतल्या असल्या तरी त्यांनी कलम ७५ (२)(iii) मध्ये नमूद विनियोगाच्या योजनेचा विषय संबंधित सभांच्या विषयपत्रिकेवर घेतला असल्याबाबत व कलम ८२ (४) नुसार मागील वर्षांचा दोष दुरुस्ती अहवाल वार्षिक सर्वसाधारण सभेसमोर ठेवल्याचे व तो विहीत मुदतीत प्रतिवादी क्र १ यांचे कार्यालयास सादर केल्याबाबत कोणतेही म्हणणे सादर केल्याचे दिसून येत नाही. तक्रार अर्जातील एक सभासद थकबाकी असला तरी इतर सभासदांच्या तक्रारीनुसार प्रतिवादी क्र १ यांना कार्यवाही करणेचा अधिकार आहे. प्रतिवादी क्र १ यांनी आदेश पारीत करताना योग्य कारणमीमांसा नमूद करुन संस्थेच्या अर्जदार या पदाधिकारी यांना ६ महिने कालावधीकरीता अपात्र केल्याचे दिसून येत आहे. त्यामूळे प्रतिवादी क्र १ यांचे आदेश कायम करणे योग्य होईल या निर्णयाप्रत मी आलो आहे.

आदेश

१. पुनरिक्षण अर्ज क्र ३३२ / २०२६ अमान्य करणेत येत आहे.
२. प्रतिवादी क्र १, उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे यांचे दि १८.०८.२०२६ रोजीचे आदेश कायम करणेत येत आहे.
३. खर्चाबाबत कोणतेही आदेश नाहीत.

सदरचा आदेश आज दिनांक २९.०९.२०२६ रोजी माझे सही व शिक्कयानिशी देत आहे.

(दिग्विजय आहेर)
विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे

जाक्र विसनि / अपिल / पुन अर्ज क्र ३३२ / २०२६ / १५०५ /सन २०२६
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
दिनांक २९.०९.२०२६

Exh- C 23

उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे यांचे कार्यालय,

सहकार वैभव, पहिला मजला,प्लॉट ई/३,मार्केटींग फेडरेशन इमारत, पीडीसीसी बँक शेजारी,
गुलटेकडी मार्केट यार्ड पुणे -३७
दुरध्वनी क्र.०२०-२४२६१९९३ ईमेल आयडी – dyrcity४@gmail.com

जा.क्र.उनि(४)/गृह/का.क/ सुनावणी/ मॅजेस्टीक अॅक्वा फेज १/३११४ /२०२५ दिनांक:- ३०/ १० / २०२५

प्रति,

१. श्री. लिंगेश्वर राम लोणारे व इतर
२. श्री. संतोष दत्तात्रय शेवाळे
३. श्री. नितीन कुतवळ
४. श्री. आरिफ आय. शेख — अर्जदार
५. श्री. कैलास कामठे
६. श्री. सौरभ कान्हे
७. श्री. विनोद कुटे
८. श्री. अमेय निरगुडकर

सर्व रा. मॅजेस्टीक अॅक्वा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्या.,
फुरसुंगी , पुणे ४१२३०८

विरुध्द

चेअरमन / सेक्रेटरी
मॅजेस्टीक अॅक्वा फेज १ सहकारी गृह. संस्था मर्या., — जाबदेणार
फुरसुंगी , पुणे ४१२३०८

विषय -: कलम ७५(५) व ८२ अंतर्गत तक्रार अर्जाचे अनुषंगाने सुनावणी नोटीस...

संदर्भ :- १. लिंगेश्वर राम लेंगरे व इतर ७ मॅजेस्टीक अॅक्वा फेज 1 सहकारी गृहरचना संस्था मर्या., फुरसुंगी, पुणे ४१२३०८ यांचा दिनांक १८.०८.२०२५ रोजीचा अर्ज
२. या कार्यालयाचे जा.क्र. उनि(४)/ गृह/का.क/ सुनावणी/ मॅजेस्टीक अॅक्वा फेज १/३१२१ /२०२५ दिनांक ०९/०९/२०२५ रोजीची सुनावणी नोटीस

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, अर्जदार श्री. लिंगेश्वर राम लोणारे व इतर यांचे दि. १८/०८/२०२५ रोजीचे अर्जानुसार अर्जदार यांनी त्यांचे अर्जात संस्थेच्या समितीने आर्थिक वर्ष २०१२ - २२ व २०२२- २०२४ या कालावधीचे लेखापरिक्षण करुन अहवाल सादर केलेला नाही. तसेच सदस्यांना आर्थिक पारदर्शकतेपासून वंचित ठेवले आहे. समितीने मागील लेखापरिक्षणावरील निरिक्षणांचा दोष दुरुस्ती अहवाल सादर केलेला नाही. आर्थिक वर्ष २०२१ - २२ व २०२२ - २४ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा निर्धारित वेळेत घेतलेल्या नाहीत. हे कलम ७५ चे उल्लंघन आहे. सदस्यांनी वारंवार लेखी व मौखिक विनंत्या करुनही समितीने कोणतीही सुधारात्मक पावले उचललेली नाहीत. ही सततची उल्लंघने असुन कलम ७५(५), ७८, ७८ A व ८२ अंतर्गत कारवाईस पात्र आहेत. तरी अर्जदार यांनी सदर व्यवस्थापन समिती बरखास्त करणे , संस्थेच्या कामकाजासाठी संस्थेच्या सभासदांमधुन त्रिसदस्यीय प्रशासकीय समिती नेमणे बाबत , प्रलंबित लेखापरिक्षण पुर्ण करुन त्रृटी दुरुस्ती अहवाल सादर करणे व प्रलंबित वार्षिक सर्वसाधारण सभा बोलावणे बाबत मागणी केली आहे.

24

सदर तक्रारीच्या अनुषंगाने सुनावणी दि. ०१/१०/२०२५ रोजी निम्न स्वाक्षरीकारासमोर, सहकार वैभव इमारत, १ ला मजला, प्लॉट नं.ई/३, हमाल भवन जवळ, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ३७ येथे सुनावणी ठेवण्यात आलेली होती. तरी सदर बाबत पुढील सुनावणी दिनांक १६/१०/२०२५ रोजी दु. ३.०० वाजता ठेवण्यात आलेली आहे. तरी सदर सुनावणीस आपण स्वत: अगर आपल्या वकिला मार्फत आवश्यक त्या कागदपत्रांसह न चुकता उपस्थित रहावे. आपल्या वतीने कोणीही हजर राहीले नाही तर सदर प्रकरणी आपणास काहीही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(डी. एस. होसारे)
उपनिबंधक
सहकारी संस्था. पुणे शहर (४), पुणे

True Copy
C/
Adv